0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक २८/१२/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) मे. गोदरेज इंडस्ट्रिज लिमिटेड यांचे दिनांक २९/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त लेखी निवेदन.

३) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८०/२०१२/जा.०८, दिनांक ०२/०१/२०१३, १७/०१/२१३ व २८/०१/२०१३.

४) मे. गोदरेज इंडस्ट्रिज लिमिटेड यांचे दिनांक १६/०१/२०१३ रोजीचे निवेदन.

५) मे. गोदरेज हर्षी लिमिटेड, मे. लिबर्टी ऑईल मिल्स् लि. व मे. रुची सोया इंडस्ट्रिज लि. यांचे दिनांक २३/०१/२०१३ रोजीचे स्वतंत्र निवेदने.

६) या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८०/२०१२/जा.१२० दि.०७/०२/२०१३.

७) मे. गोदरेज हर्षी लिमिटेड यांचे दिनांक ०७/०२/२०१३ रोजीचे निवेदन.

८) अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचे पत्र क्र. एफटीएल/एफडीओ/११(१)/१३ दिनांक २२/०२/२०१३ अन्वये प्राप्त पृथःकरण अहवाल.

९) जिल्हाधिकारी कार्यालय रायगड, अलिबाग यांचे दिनांक ०४/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त पत्र क्रमांक-पुरवठा/कात-१२/अं.उ.प्र./२०१३ दिनांक २२/०२/२०१३.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८०/२०१२/जा. 283
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : 09 /04/२०१३.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

मे. गोदरेज फूडस लिमिटेड, एल. एम. नाडकर्णी मार्ग, ॲन्टाप हिल, वडाळा पूर्व, मुंबई - ३७ या कंपनीत या कार्यालयाच्या अधिपत्त्याखालील उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांच्या पथकामार्फत दिनांक १३/१२/२०१२ रोजी करण्यात आलेल्या परवाना तपासणी व साठा तपासणीच्या अनुषंगाने करावयाच्या सखोल तपासणीसाठी सदरहू कंपनीकडे अधिकृत घाऊक परवाना व मिलर परवाना यासह आयात माल दर्शविणारे बिल

ऑफ एन्ट्री नसलेला माल जप्त करण्याची रितसर कार्यवाही करण्यासाठी फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पथक यांनी पंचांसह दिनांक १५/१२/२०१२ रोजी सायंकाळी ५.३० वाजता कंपनीच्या गेटमधून प्रवेश केला असता कंपनीच्या मुख्य माल गोदामाच्या समोर कंपनी व्यवस्थापनाकडील श्री. सूर्यचंद्र प्रसाद सिनियर एक्झीक्युटीव्ह, श्री. सुहास केरकर, श्री. गोपाळ मोरस्कर उपस्थित होते. पथकातील अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष कंपनी व्यवस्थापनाचे श्री. सूर्यचंद्र प्रसाद, सिनियर एक्झीक्युटीव्ह यांना सद्य:स्थितील कंपनी अथवा कंपनीच्या परिसरात साठवणूक केलेल्या विविध प्रकारचे खाद्यतेल/वनस्पती तेलाचा पॅकिंग केलेला अथवा सुटा साठ्याबाबत विचारणा केली असता, उपस्थित अधिकारी यांनी कंपनीमध्ये वनस्पती तेल, वनस्पती तूप, सनफ्लावर तेल, पामतेल व शेंगदाणे तेलाचे मार्केटसाठी पॅक झालेले डबे प्रक्रीयेमध्ये असलेले तेलाचे ठिकाण व तेल साठवणूकीच्या टाक्या पथकास दर्शवून दिल्या. तसेच शेंगदाणे तेलाचा २०१.२८ क्विंटल साठा वगळता उर्वरित सर्व प्रकारातील तेल आयात माल असल्याचे सांगितले. पथकाने सदर खाद्यतेलाचा साठा आयांत केला असल्यास त्याबाबत पुरावादर्शक कागदपत्रे म्हणजेच बिल ऑफ एन्ट्री इ. कागदपत्रे सादर करणेकामी पथकातील अधिकाऱ्यांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांना विनंती केली असता, आता सध्या आयात केलेल्या तेलाचे बिल ऑफ एन्ट्री अथवा इतर कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे सांगून सदरचे कागदपत्रे दोन दिवसात न चुकता आपले कार्यालयास सादर करु असे सांगितले. सबब, पथकातील अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष बिल ऑफ एन्ट्री विषयक कागदपत्र नसलेल्या तेलसाठा सिल करणेची आवश्यकता समजावून सांगितली. त्यानुसार कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सहकार्याची भूमिका घेवून कंपनीमध्ये उपलब्ध असलेला व बिल ऑफ एन्ट्री नसलेला तेल साठयाची खालील नमूद प्रमाणे ठिकाणे दर्शविली.

कंपनीचे श्री. सूर्यचंद्र प्रसाद यांनी पथकातील अधिकारी व पंचास सर्वप्रथम मुख्य गोदामाकडे नेले. त्या ठिकाणी वनस्पती तूप ८५६.१९ क्विंटल, सनफ्लावर तेल ३१७.५१ क्विंटल, पामतेल १७.९२ क्विंटल, शेंगदाणे तेल ३११.३९ क्विंटल इतका खाद्यतेल/वनस्पती तेलाचा साठा निदर्शनास आणला. तथापी, महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये खाद्यतेल/वनस्पती तेल या अनुसुचित वस्तुंच्या व्यवसायासाठी आवश्यक असणारा साठवणूकीचा रितसर परवाना नसल्याची बाब कंपनीच्या उपस्थित अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष मान्य केली आहे. उपरोक्त नमूद एकूण १५०३.०२ क्विंटल खाद्यतेल/वनस्पती तेलाचा साठा मुख्य गोदामात उपलब्ध असल्याचे कंपनीच्या अधिकाऱ्यांनी नमूद केले. सबब सदरचा खाद्यतेल/वनस्पती तेलाचा विनापरवाना आढळून आलेला साठा पथकातील अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ चे कलम १५ (सी) नुसार पंचांसमक्ष सिलबंद करुन जप्त केला.

तद्नंतर श्री. सुर्यचंद्र प्रसाद सिनियर एक्झीक्युटीव्ह यांनी पथकातील अधिकारी व पंचास कोल्ड रुम व त्याला लागून असलेल्या दोन स्वंतत्र खोल्या येथे नेवून त्या ठिकाणी असलेल्या वनस्पती तुप गोठविण्यासाठी ठेवलेला

00मिळे एकूण ९४७ डब्बे, १५ लिटर्सचे ५०० एम एल चे ३२४ बॉक्स व २०० एम एल चे १७४ बॉक्स दाखविण्यात आले. सदरचा तीनही ठिकाणातील खाद्यतेलाचा साठा हा ३५x२५ चौ. फूट क्षेत्रफळाच्या एकाच खोलीमध्ये एकत्रित स्थंलातरीत करुन सदरची खोली पंचासमक्ष सिलबंद करण्यात आली व विनापरवाना आढळून आलेला खाद्यतेलाचा साठा जागीच जप्त करण्यात आला.

तदनंतर श्री. सुर्यचंद्र प्रसांद सिनियर एक्झीक्युटीव्ह यांनी साठवणूक करण्याच्या टाकीकडे अधिकारी व पंचास नेले असता समोर दोन आठ फूट उंची व सहा फूट रुदींच्या धातूच्या टाक्या दिसून आल्या. सदरच्या टाक्यांमधील खाद्यतेलाची मोजणी सळीच्या द्वारे करुन एकूण १५.५ क्विंटल शेंगदाणा तेल असल्याचे श्री. सुर्यचंद्र प्रसाद सिनियर एक्झीक्युटीव्ह यांनी सांगितले. सदरचा विनापरवाना तेलसाठा अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष जप्त करुन टाकीच्या नोझल्सला सिलबंद करण्यात आले.

तद्नंतर श्री. सुर्यचंद्र प्रसाद सिनियर एक्झीक्युटीव्ह आणि श्री. गोपाल मोरजर स्टोअर ऑफीसर यांनी कंपनीच्या आवारात उभ्या असलेल्या तीन टँकरकडे पथकातील अधिकारी व पंचांना नेण्यात आले. टँकर क्र.एमएच-४३-यू-२२९६ यामध्ये सनफ्लावर तेलाचा साठा १५८.३० क्विंटल, टँकर क्र.एमएच-०४-सीपी-७५९८ यामध्ये सनफ्लावर तेलाचा साठा १५९.५० क्विंटल व टँकर क्र.एमएच-०४-ईएल-३३२६ यामध्ये सनफ्लावर तेलाचा साठा १९७.८० क्विंटल असल्याचे सांगितले. उपरोक्त तीनही टँकरमधील एकूण ५१५.६० क्विंटल तेलाचा सांठा जप्त करुन उपरोक्त तीनही टँकरच्या नोझला सिलबंद करण्यात आले.

याप्रमाणे सद्य:स्थितीत कंपनीमध्ये आढळून आलेला तेलसाठा (टँकरमधील तेलसाठयासह) खालीलप्रमाणे आहे.

| अनु.क्र | खाद्य तेलाचे प्रकार | साठा (क्वींटल) | अदांजित किंमत |
|---|---|---|---|
| १. | शेगंदाणा तेल | ३११.३९ | ५६,०५,०२०/- |
| २. | सनफ्लॉवर तेल | ८३३.१२ | ९९,९७,४४०/- |
| ३. | वनस्पती तूप | ८५६.१९ | ८५,६१,९००/- |
| ४. | ज्येष्टा पाम तेल | १७.९२ | १६,२८०/- |
| | एकूण | २०१८.६२ | २,४१,८०,६४०/- |

तद्नंतर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले की, त्यांचे कंपनीत आयात केलेल्या सनफ्लावर तेल, पामतेल, वनस्पती तेलावर रिफायनिंगची प्रक्रीया केली जाते. आयात केलेल्या तेलावर साठा मर्यादा लागू नाही. तसेच त्यांच्या कंपनीत तयार होणारे वनस्पती तुप आयात केलेल्या पामोलिन तेल, सोया तेल व पामोलिन यापासून बनविले जाते. याचा अर्थ कंपनीमध्ये तयार होणारे वनस्पती तुप आयात केलेल्या मिश्रनातून केले जाते. असा खुलासा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी केला. मात्र सदरचे तेल आयात केलेले आहे ते दर्शविणारे पुरावादर्शक

कागदपत्रे उदा. बील ऑफ एन्ट्री दाखवू शकले नाही, याकामी दोन दिवसाची मुदत मिळावी म्हणून विनंती केली. उपरोक्त प्रमाणे जप्त केलेला एकूण २०१८.६२ क्विंटल खाद्यतेल/वनस्पती तेलाचा साठा सुपुर्तनामा करुन सुरक्षिततेकामी श्री. मुकेश श्रीवास्तव, मॅनेजर ऑपरेशन यांना पंचासमक्ष सुर्पुत करण्यात आला. तसेच जप्त केलेल्या तेल साठ्यातील प्रत्येक तेल प्रकाराच्या ७५० मि.लि. च्या प्रत्येकी ३ बाटल्यात त्यांचे नमुने पंचांसमक्ष सिलबंद करुन ताब्यात घेण्यात आल्यां.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ चे कलम २ (क्यु) अन्वये नमुद केलेल्या व्याख्येमध्ये मिलर तसेच कलम २ (टी) मध्ये आईल मिलची व्याख्या स्पष्टपणे नमुद आहे. मे. गोदरेज फूडस लिमिटेड, एल. एम. नाडकर्णी मार्ग, ॲन्टाप हिल, वडाळा पूर्व, मुंबई - ३७ या कंपनीत खाद्यतेल/वनस्पतीचा सुटा साठा हा विविध क्षमतेच्या पॅकिंगमध्ये नमुद कंपनी ही स्वतःचे उत्पादन व ब्रांड म्हणून खाद्यतेल/वनस्पतीचा व्यवसाय करीत असल्याचे आढळून आले आहे. सदरचा अंतिम उत्पादीत साठा हा स्थानिक अथवा राज्यस्तरीय पातळीवर कंपनीकडून नेमणूक केलेल्या वितरकांना (डिस्ट्रीब्युटर) साठ्याची विक्री केली जात असल्याने नमुद कंपनीकडे महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये ऑईल मिल/मिलरचा परवाना घेणे आवश्यक असतांना सदर कंपनीने मिलरचा परवाना धारण केला नसल्याचे तसेच त्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडे अर्जही सादर केला नसल्याचे आढळून आले ही बाब गंभीर आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी वरील वाचावे क्र. १ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली आहे. त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तुंचा साठा सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १६/०१/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १६/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस ॲड. श्री. किर्ती पारेख हे वकालतनामा व मे. गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनीच्या प्राधिकारपत्रासह उपस्थित राहिले व कंपनीच्या वतीने वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणी मे. गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेडचे सिनियर एक्झीक्युटीव्ह श्री. सूर्यचंद्र प्रसाद, असोसिएट वाईस प्रेसिडेंट श्री. व्ही.जी. हजारे, श्री. सुहास केरकर व श्री. गोपाळ मोरस्कर हे उपस्थित राहिले. मे. गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेडचे उपस्थित अधिकाऱ्यांनी त्यांच्या नमूद कंपनीत केवळ रिफायनिंगची प्रक्रिया केली जात असून सदरचा खाद्यतेलाचा साठा हा मे. गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीच्या मालकीचा नसल्याचे सांगून त्यांना रिफायनिंग करिता मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीने पाठविला असून सदरचा साठा मे. गोदरेज हर्षी लि. या

0005 कंपनीच्या मालकीचा असल्याचे सांगितले. तथापी, मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. च्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात सदर बाबींचा उल्लेख केल्याचे आढळून आले नाही. तसेच घटनास्थळी सादर केलेल्या खरेदी बिलांमध्ये मे. लिबर्टी ऑईल मिल्स् लि. व मे. रुची सोया इंडस्ट्रिज लि. या दोन्ही आस्थापनांकडूनही खाद्यतेलाच्या साठ्याची खरेदीबाबतचे इन्व्हाईस सादर केल्याचे दिसून येते. सबब, सदर बाबींची अधिक खातरजमा करण्याकरीता मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. यांना केलेल्या मागील तीन महिन्यांच्या वितरणाच्या तपशिलासह वरील नमूद सर्व आस्थापनांना त्यांचे लेखी व मौखिक म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २३/०१/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २३/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस ॲड. श्री. किर्ती पारेख हे मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीच्या वतीने वकालतनाम्यासह व त्यांचे समवेत मे. गोदरेज हर्षी लि. चे सिनियर एक्झीक्युटीव (लिगल) श्री. प्रशांत पोरे, उपमहाव्यवस्थापक श्री. अरुण नारायण चव्हाण उपस्थित राहिले. तसेच मे. गोदरेज इंडस्ट्रिज लिमिटेडचे असोसिएट वाईस प्रेसिडेंट श्री. व्ही.जी. हजारे व मॅनेजर ऑपरेशन श्री. एम. के. श्रीवास्तव तसेच मे. लिबर्टी ऑईल मिल्स् लि. चे व्हाईस प्रेसिडेंट मार्केटिंग श्री. ए.एस. स्वामीनाथन यांनी प्राधिकारपत्रासह व मे. रुची सोया इंडस्ट्रिज लि. चे सहाय्यक व्यवस्थापक (लिगल) श्री. षणमुख पबड्डी यांनी उपस्थित राहून कंपनीच्या वतीने वाचावे क्र. ५ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली.

मे. लिबर्टी ऑईल मिल्स् लि. च्या वतीने सुनावणीस उपस्थितांनी निवेदनासोबत या कार्यालयास सादर केलेल्या मासिक विवरणपत्राच्या छायांकित प्रती सादर केल्या. तथापी, मे. रुची सोया इंडस्ट्रिज लि. यांनी मासिक विवरणपत्र जिल्हाधिकारी, रायगड यांना सादर केल्याचे सांगितले असल्याने याबाबत जिल्हापुरवठा अधिकारी, रायगड यांचेकडे खातरजमा करणेकरीता या कार्यालयाचे वाचावे क्र. ६ अन्वये पत्र निर्गमित करण्यात आले.

सुनावणीच्यावेळी गोदरेज कुक-लाईट या खाद्यतेलाची १ लिटर पामतेलाची पॅक बंद पिशवी उपस्थितांसमोर निरिक्षणासाठी ठेवण्यात आली. सदर पॅकबंद पिशवीवर manufactured & packed by मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. तसेच मार्केटिंग बाय मे. गोदरेज हर्षी असे प्रिंट केल्याचे निदर्शनास आणून दिले. सबब, सदरचा साठयाची मालकी उत्पादकाची आहे अथवा मार्केटरची आहे, याचा बोध होत नाही. मे. गोदरेज हर्षीचे प्रतिनिधींनी सदर साठा मे. गोदरेज इंडस्ट्रिज यांना देण्यास त्यांची हरकत नसल्याचे सांगितले. तथापी, यापूर्वीच्या सुनावणीस मे. गोदरेज इंडस्ट्रिजचे प्रतिनिधींनी सदर साठा मे. गोदरेज हर्षी लि. यांचा मालकीचा असल्याचे सांगितले व आज रोजीच्या सुनावणीस सदरचा साठा हा मे. गोदरेज हर्षी लि. यांचा मालकीचा असल्याचे दिसुन येत नाही.

0006 मे. लिबर्टी ऑईल मिल्स् लि. व मे. रुची सोया इंडस्ट्रिज लि. या दोन्ही कंपन्यांच्या प्रतिनिधींना त्यांचे वतीने विक्री केलेला खाद्यतेलाचा साठा बिलावरील नमूद मे. गोदरेज हर्षी, विक्रोळी येथील पत्त्यावर केले अथवा मे. गोदरेज इंडस्ट्रिज, वडाळा येथे केले याबाबत विचारणा केली असता, त्यांनी मे. गोदरेज हर्षी यांच्या विक्रोळी येथील पत्त्यावर वितरण केल्याचे सांगितले. तसेच याबाबत मे. गोदरेज हर्षीच्या प्रतिनिधीनी मान्य केले असून तद्नंतर सदरचा साठा आवक झाल्यानंतर वडाळा येथील मे. गोदरेज इंडस्ट्रिज येथे रिफायनिंग करीता पाठवित असल्याचे सांगितले. सदर बाबत नमूद दोन्ही कंपन्यांकडून खरेदी केलेल्या खाद्यतेलाच्या साठ्याची मुळ बिले सादर करण्यास सुचित केले असता, सद्य:स्थितीत ती उपलब्ध नसल्याने सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सबब, संबंधितांना त्यांचे लेखी व मौखिक म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०७/०२/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०७/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस ॲड. श्री. किर्ती पारेख यांनी मे. गोदरेज हर्षी लि. व मे. गोदरेज इंडस्ट्रिज लि. या दोन्ही कंपन्यांच्या वतीने उपस्थित राहून मे. गोदरेज हर्षी लि. यांचे वाचावे क्र. ७ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मे. गोदरेज हर्षी लि. चे सिनियर एक्झीक्यिटीव (लिगल) श्री. प्रशांत पोरे, उपमहाव्यवस्थापक श्री. अरुण नारायण चव्हाण, मे. गोदरेज इंडस्ट्रिज लिमिटेडचे असोसिएट वाईस प्रेसिडेंट श्री. व्ही.जी. हजारे, मॅनेजर ऑपरेशन श्री. एम. के. श्रीवास्तव हे उपस्थित होते. सुनावणीस उपस्थित मे. गोदरेज हर्षी लि. च्या अधिकाऱ्यांना ते दावा करीत असलेला खाद्यतेलाच्या साठ्याबाबत आवक नोंदी संबंधीत कार्यालयाचा अभिलेख सादर करण्यास सुचित केले असता, सदर साठा खरेदी केल्यानंतर तो थेट मे. गोदरेज इंडस्ट्रिज लि., वडाळा येथे वितरण होत असल्याचे सांगितले. तथापी, उपस्थित अधिकाऱ्यांनी यापूर्वीच्या सुनावणीस आवक साठा हा त्यांच्या विक्रोळी येथील कंपनीत टँकर आल्यानंतर तो वडाळा येथे पाठवित असल्याबाबत निदर्शनास आणून दिले. तसेच सदर सुनावणीस मे. कारगील यांचे खरेदी बिलांवर मे. गोदरेज हर्षी लि. हे खरेदीदार तसेच साठा आवक (shipment) म्हणून मे. गोदरेज हर्षी लि. ची नोंद असल्याचे निदर्शनास आणून दिले असता त्यांबाबत समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. सदर सुनावणीस दोन्ही कंपन्यांनी साठा मालकीसंबंधी केलेले युक्तीवाद हे या कार्यालयाची दिशाभूल करणारे असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सर्व संबंधितांनी सादर केलेले खरेदी बिलांवर बरेचसे पुरवठादार असल्याचे दिसून येते. तथापी, यापुर्वीच्या सुनावणीस त्यांनी मे. रुची सोया इंडस्ट्रिज लि. व मे. लिबर्टी ऑईल मिल्स् लि. यांच्याकडून खरेदी केल्याचे सांगितले आहे.

अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचेकडून वाचावे क्र. ८ अन्वये प्राप्त झालेल्या रासायनिक पृथ:करण अहवालामध्ये " and I am of the opinion that above sample of Crude Groundnut Oil does

0007confirm to the standards of Groundnut Oil as per Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulation 2011", असे नमूद आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

मे. गोदरेज इंडस्ट्रिज लिमिटेड यांचे दिनांक २९/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, ते त्यांच्या वडाळास्थित फॅक्टरीमध्ये विविध पार्ट्यांच्या खाद्यतेल व वनस्पती तेलावर प्रक्रिया करीत आहेत. त्यांच्याकडे शिधावाटप विभागाचा खाद्यतेल आणि वनस्पतीचा घाऊक व मिलरचा परवाना सन २००३ पर्यंत वैध होता. सन २००२ मध्ये शासनाने खाद्यतेलावरील रेशनिंग कंट्रोल काढले. तद्नंतर सन २००८ मध्ये शासनाने पुन्हा निर्बंध आणल्याने शिधावाटप विभागाचा खाद्यतेलाच्या परवान्याची गरज आहे. आमच्या कंपनीत इतर आस्थापनांच्या खाद्यतेल व वनस्पतीची प्रक्रिया होत असली तरीही दिनांक १६/०५/२००८ रोजी आपल्या कार्यालयास अर्ज करुन शिधावाटप परवाना मिळण्यास विनंती केली. तद्नंतर दिनांक २५/०६/२००८ रोजी रीतसर आवश्यक कागदपत्रांसहीत आपल्या कार्यालयास परवान्यासाठी अर्ज केला आहे. त्याकरीता आवश्यक फी देखिल भरली आहे. दिनांक १५/१२/२०१२ रोजी आपल्या अधिकाऱ्यांनी आमच्या फॅक्टरीवर भेट दिली असता त्यांना बिल ऑफ लिडींग व्यतिरीक्त आवश्यक कागदपत्रे सादर केली. उर्वरीत कागदपत्रे सादर करण्याकरीता अधिकाऱ्यांकडे वेळ मागितली. कारण, संबंधित आस्थापना हे आयात खात्यासंबंधीचे कागदपत्रे साठ्यासोबत देत नाहीत. तद्नंतर दिनांक १८/१२/२०१२ रोजी आपल्या कार्यालयात इतर कागदपत्रांसोबत बिल ऑफ लिडींग सादर केले आहे. आपल्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या सुचनेनुसार आम्ही नविन परवान्याकरीता आवश्यक कागदपत्रांसह दिनांक १८/१२/२०१२ रोजी अर्ज सादर केला आहे. त्यानंतर आम्ही सतत पाठपुरावा करीत आहोत. आपण सुचित केल्यानुसार मिलर परवाना प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे आम्ही प्राप्त करुन घेत आहोत. त्याअनुषंगाने लवकरच आपल्या कार्यालयात अर्ज सादर करण्यात येईल. भविष्यात कंपनीमध्ये सर्व कागदपत्रे निरीक्षणासाठी तयार ठेवण्यात येतील. तरी जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन, तसे लेखी निवदेन सादर केले.

दिनांक १६/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस ॲड. श्री. किर्ती पारेख यांनी मे. गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीच्यावतीने सादर केलेले निवेदनात, मे. गोदरेज समुह कंपनी ही नामांकित कंपनी असुन मागील ११३ वर्षापासुन पारदर्शकपणे व्यवसाय करीत आहे. आपल्या निदर्शनास आणु इच्छितो की, सन २००६ साली मे. गोदरेज फुडस लि. हीं कंपनी मे. गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेड या नावाने रुपांतरीत करण्यात आली. सदर कंपनी ही तिऱ्हाईत पक्षाकरीता खाद्यतेल व वनस्पतीची प्रक्रिया करीत आहे. दिनांक २५/०६/२००८ रोजी त्यांच्या कंपनीने आवश्यक

कागदपत्रे व विहीत फी भरुन डिलर परवान्याकरीता अर्ज केलेला आहे व त्यानंतर नियमितपणे आपल्या कार्यालयात पाठपुरावा करीत असुन आजमितीस त्यांना परवाना प्राप्त झालेला नाही. खाद्यतेल व वनस्पतीच्या प्रक्रियेकरीता आयात केलेल्या खाद्यतेलाच्या साठ्याचा वापर करीत आहेत. विविध आस्थापनांकडून प्राप्त खाद्यतेल व वनस्पती तेल साठ्याच्या प्रक्रियेकरीता प्रक्रिया शुल्क आकारला जात आहे. सदर प्रकरणी जप्त साठा हा मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीचा असुन त्याकरीता मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. करारबद्ध आहे. प्रक्रियेनंतर सदरचा साठा हा मे. गोदरेज हर्षी लि. यांना परत पाठविण्यात येतो व खाद्यतेलाच्या प्रक्रियेकरीता मे. गोदरेज हर्षी लि. यांना प्रक्रिया शुल्क आकारला जातो. जप्त साठा हा मे. गोदरेज हर्षी लि. यांचेकडून दिनांक २१/११/२०१२ ते १५/१२/२०१२ या कालावधीत प्राप्त झालेला आहे. नोटीसमध्ये नमूद केल्यानुसार ते स्पष्ट करु इच्छितात की, ते खाद्यतेलाचे उत्पादन करीत नसल्याने त्यांच्या कंपनीला मिलर परवान्याची आवश्यकता नाही. तपासणीचेवेळी आयात केलेल्या वनस्पती साठ्याचे बिल ऑफ एन्ट्री दिनांक १७/१२/२०१२ रोजी सादर केले आहे. जप्त साठा हा नांशवंत असल्याने तो खराब झाल्यास मानवीय खाण्यास योग्य राहणार नाही. तरी त्यांचा जप्त करण्यात आलेला साठा लवकरात लवकर मुक्त करण्याची विनंती करुन, तसे लेखी निवदेन सादर केले.

मे. गोदरेज हर्षी लिमिटेड, या कंपनीच्या वतीने दिनांक २३/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस सादर केलेल्या लेखी निवेदनात, मे. गोदरेज हर्षी लिमिटेड ही खाद्यतेल व वनस्पतीच्या मार्केटींग व विक्रीचा व्यवसाय करीत असुन दिनांक २५/०५/२००८ रोजी त्यांनी घाऊक परवान्याकरीता अर्ज केलेला आहे व तद्नंतर आवश्यकते नुसार कागदपत्रांची पुर्तताही केलेली आहे. दिनांक १५/०६/२००७ रोजी त्यांच्या कंपनीने मे. गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनी सोबत खाद्यतेलाच्या प्रक्रियेसाठी करारनामा केला आहे. सदर करारनाम्यानुसार त्यांची कंपनी विविध कंपन्यांकडून खाद्यतेलाचा साठा खरेदी करुन मे. गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्याकडे प्रक्रियेकरीता देण्यात येते. सदर प्रक्रियेकरीता इतर आवश्यक केमिकल्स, विटामीन, हायड्रोजन गॅसचाही पुरवठा करण्यात येतो. दिनांक १५/१२/२०१२ रोजी जप्त करण्यात आलेला साठा हा त्यांनी मे. लिबर्टी ऑईल मिल्स् लि. व मे. रुची सोया इंडस्ट्रिज लि. या पुरवठादार/आयातदार कंपनीकडून खरेदी केलेला आहे. तरी सदरचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन, तसे लेखी निवदेन सादर केले.

मे. लिबर्टी ऑईल मिल्स् लि. व मे. रुची सोया इंडस्ट्रिज लि., या कंपनीच्या वतीने दिनांक २३/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस सादर केलेल्या स्वतंत्र लेखी निवेदनात, मागील ३ महिन्यांपासुन म्हणजेच माहे ऑक्टोंबर २०१३ ते डिसेंबर २०१२ या कालावधीत त्यांनी मे. गोदरेज फुडस् लि. या कंपनीत खाद्यतेलाचा पुरवठा केला नसुन त्यांनी मे. गोदरेज हर्षी लिमिटेड या कंपनीस पुरवठा केल्याचे नमूद करुन त्याच्या पुराव्यादाखल टॅक्स इनव्हाईस बिल व बिल ऑफ एन्ट्रीच्या छायांकित प्रती सादर केल्या आहेत असे नमूद करुन, तसे लेखी निवदेन सादर केले.

0009 मे. गोदरेज हर्षी लिमिटेड या कंपनीच्या वतीने दिनांक ०७/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस सादर केलेल्या लेखी निवेदनात, आपण गोदरेज कुक-लाईट या १ लिटर पॅक बंद पिशवीचे निरीक्षण करुन उत्पादक म्हणून मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. असे निदर्शनास आणुन दिले आहे. परंतु, याबाबत स्पष्ट करण्यात येते की, अन्न सुरक्षा आणि दर्जा कायदा, २००६ आणि अन्न सुरक्षा आणि दर्जा (पॅकींग आणि लेबलिंग) अधिनियम, २०११ अन्वये सदरचे लेबल हे साठ्याची पत तसेच उत्पादकाबाबतची ओळख/निदर्शक आहे. सदर प्रकरणी मे. गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेड ही कंपनी साठ्याची प्रक्रिया व पॅकींग करीत असल्याने ते उत्पादक या व्याख्येत संबोधले गेले आहेत. त्यामुळे अन्न सुरक्षा व दर्जा कायद्यानुसार मे. गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेड हे उत्पादक असुन सदर साठ्याचे मे. गोदरेज हर्षी लिमिटेड हे मालक असल्याने ते मार्केटर आहेत. मे. गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेड यांचेकडे प्रत्यक्ष साठ्याचा ताबा असल्याने व त्यांच्याशी करारनामा असल्याने जप्त करण्यात आलेला साठा हा मे गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेड यांना परत करण्यास त्यांची कांहीही हरकत नाही. या सर्वबाबत मे. गोदरेज हर्षी लिमिटेडच्या अधिकाऱ्यांनी पुरावादर्शक कागदपत्रांसह सुनावणी उपस्थित राहुन खुलासा सादर केला आहे. सदर साठा जप्त असल्याने त्यांच्या कंपनीचे आर्थिक नुकसान होत असल्या कारणाने तो मुक्त करण्यात यावा असे नमूद करुन, तसे लेखी निवदेन सादर केले.

या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८०/२०१२/जा.१२० दि.०७/०२/२०१३ अन्वये मे. रुची सोया इंडस्ट्रिज लि. इसांबे, सावरोली, खारपाडा रोड, पाताळगंगा, ता. खालापुर यांनी आयात केलेल्या खाद्यतेलाच्या साठ्याबाबत प्रचलित पद्धतीनुसार मासिक विवरण पत्र सादर केले किंवा कसे ? याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड यांना विचारणा केली असता, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड, अलिबाग यांचे दिनांक ०४/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त पत्रात, मे. रुची सोया इंडस्ट्रिज लि. इसांबे, सावरोली, खारपाडा रोड, पाताळगंगा, ता. खालापुर यांनी आयात केलेल्या खाद्यतेलाबाबतची विवरणपत्रे माहे ऑक्टोबर, २०१२ चे दिनांक १७/११/२०१२, माहे नोव्हेंबर-२०१२ चे दिनांक ११/१२/२०१२ रोजी व माहे डिसेंबर-२०१२ चे दिनांक १५/०१/२०१३ रोजी त्यांच्या कार्यालयात सादर केलेले असल्याचे नमूद करुन संदर मासिक विवरणपत्रांच्या छायाप्रती सादर केल्या आहेत.

उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा तथा अनुज्ञप्ती प्राधिकारी यांचा दिनांक २१/०३/२०१३ रोजी प्राप्त अहवालात, महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ अन्वये घाऊक परवाना मिळण्यासाठी मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. यांनी दिनांक २५/०६/२००८ रोजी ई परिमंडळ, वडाळा कार्यालयास अर्ज सादर केला आहे. दिनांक १३/१२/२०१२ व १५/१२/२०१२ रोजी मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. येथील तेल कंपनीमध्ये अचानक घेतलेल्या तपासणीमध्ये घाऊक परवाना दिसुन आला नाही त्यामुळे कंपनीत आढळुन आलेला विनापरवाना तेल साठा सिलबंद करुन जप्त करण्यात आला आहे. दिनांक १७/१२/२०१२ रोजी श्री. मुकेश

श्रीवास्तव, मॅनेजर ऑपरेशन यांनी जप्त केलेला तेलसाठा हा आयात केलेला असल्याचे पत्र सादर केले असुन सदर पत्रामध्ये इनव्हाईस बिल व बिल ऑफ एन्ट्री सत्य असल्याचे नमूद केले आहे. शेंगदाणा तेलाचा ३१.७५ मे.टन महाराष्ट्रातुन आणलेला असल्याबात कोणाताही अधिकृत परवाना कंपनीकडे दिसुन आला नाही. तद्नंतर सदर कंपनी खाद्यतेलाचा परवाना घेण्यास इच्छुक असल्यास पुन्हा साक्षांकित कागदपत्रे तात्काळ सादर करण्याबाबत दिनांक १७/१२/२०१२ रोजी नोटीस वजा पत्र कंपनीस दिले असुन त्यानुसार कंपनीच्या वतीने श्री. व्ही.जे. हजारे, उप मुख्यव्यवस्थापक यांनी अर्जासोबत त्यांचे अगर त्यांचे कंपनी विरुद्ध जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ अंतर्गत कोणत्याही प्रकारची कायदेशीर कारवाई झाली नसल्याबाबत दिनांक १८/१२/२०१२ चे प्रतिज्ञापत्र, तसेच कंपनीचे नावावर भागीदाराविरुद्ध पोलिस केस/डी.आर.आर/अत्यावश्यक वस्तु कायदेभंगाबाबत अटक अथवा शिक्षा झाली नसल्याचे, दुकानाच्या/परवान्याच्या भागीदारात बदल झालेला नाही व शासनास कोणतीही रक्कम देय नसल्याबाबत श्री. व्ही.जे. हजारे यांनी घोषणापत्र सादर केले आहे. तसेच कारखाना नोंदणी प्रमाणपत्र क्र. १०५३६० चे दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचा कारखाना नुतनीकरण परवाना दिनांक ३१/३/२०१३ पर्यंत वैध, अन्न व भेसळ परवाना दिनांक ३१/१२/२०१३ पर्यंत वैध, व्यवसायाची जागा ही मुंबई पोर्ट ट्रस्ट यांची असल्याने ती लिजद्वारे घेतल्याबाबतचे करारपत्र सादर केले असल्याचे नमूद आहे.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखुन ठेवण्यात आले.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील साठा मालक यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, मे. गोदरेज फूडस लिमिटेड, एल. एम. नाडकर्णी मार्ग, ॲन्टाप हिल, वडाळा पूर्व, मुंबई ३७ या कंपनीत या कार्यालयाच्या अधिपत्त्याखालील उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांच्या पथकामार्फत दिनांक १३/१२/२०१२ रोजी करण्यात आलेल्या परवाना तपासणी व साठा तपासणीच्या अनुषंगाने करावयाच्या सखोल तपासणीसाठी सदरहू कंपनीकडे अधिकृत घाऊक परवाना व मिलर परवाना यासह आयात माल दर्शविणारे बिल ऑफ एन्ट्री नसलेला माल जप्त करण्याची रितसर कार्यवाही करण्यासाठी फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पथक यांनी पंचांसह दिनांक १५/१२/२०१२ रोजी उपरोक्त कंपनीत जाऊन तपासणी केली असता, खाद्यतेल/वनस्पतीचा सुटा साठा हा विविध क्षमतेच्या पॅकिंगमध्ये नमुद कंपनी ही स्वत:चे उत्पादन व ब्रांड म्हणून खाद्यतेल/वनस्पतीचा व्यवसाय करीत असल्याचे आढळून आले. सदरचा अंतिम उत्पादीत साठा हा स्थानिक अथवा राज्यस्तरीय पातळीवर कंपनीकडून नेमणूक केलेल्या वितरकांना (डिस्ट्रीब्युटर) साठ्याची विक्री केली जात

0असल्याने नमुद कंपनीकडे महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये ऑईल मिल/मिलरचा परवाना घेणे आवश्यक असताना सदर कंपनीने मिलरचा परवाना धारण केला नसल्याचे तंसेच त्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडे अर्जही सादर केला नसल्याचे आढळून आल्याने, एकूण २०१८.६२ क्विंटल खाद्यतेल/वनस्पती तेलाचा साठा जप्त केला व सुपुर्तनामा करुन सुरक्षिततेकामी श्री. मुकेश श्रीवास्तव, मॅनेजर ऑपरेशन यांना पंचासमक्ष सुर्पुत करण्यात आला.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२३२० (ई), दिनांक २७/०९/२०१२ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत. शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत. त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे.

केंद्रशासनाची "Removal of (Licensing requirements, stock limits and Movement Restrictions) on specified foodstuffs (Amendment) Order, २०१०" या अधिसुचनेमधील अनुक्रमांक ३ मध्ये "Nothing contained in this Order shall affect the transport, distribution or disposal of edible oils, edible oilseeds, rice, pulses and paddy to places outside the state nor shall it be applicable to import of these commodities" असे नमुद आहे. तथापी, शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००९/५४०/प्र.क्र.२११/ना.पु.२३ दिनांक ८ जुन २००९ अन्वये खाद्यतेल साठा मर्यादा व परवाना घेण्याची आवश्यकता याबाबत लागू केलेले निर्बंध हे आयात केलेल्या खाद्यतेलासाठी लागू राहणार नाहीत. त्यामुळे आयात केलेल्या खाद्यतेलाच्या साठवणूक व प्रक्रियेसाठी व्यापाऱ्यांना परवाना घेण्याची आवश्यकता नाही. तथापी, त्यांनी आयात केलेल्या खाद्यतेलाची खरेदी विक्री केल्यास यापुढे पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उपनियंत्रक शिधावाटप यांचेकडे रिटर्न्स भरावेत. रिटर्न्स भरतांना त्यामध्ये कंपनीच्या मालकाचे नांव, नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता, गोदामाचा पत्ता, सुरुवातीची शिल्लक, आयात केलेल्या खाद्यतेलाचा तपशिल, विक्री केलेल्या खाद्यतेलाचा तपशिल, शिल्लक साठा इत्यादींचा स्पष्ट उल्लेख असावा असे नमूद आहे. तसेच आयात खाद्यतेलाची विक्री करताना पावतीवर " Imported Edible Oil" असा

स्पष्ट उल्लेख करावा व आयात केलेल्या खाद्यतेलावरील क्रमांक व दिनांक पावतीवर स्पष्टपणे नमूद करुन बिल ऑफ एन्ट्रीची एक सत्य प्रत संबंधितांना द्यावी, असे स्पष्ट नमूद आहे.

मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि., एल.एम. नाडकर्णी मार्ग, ॲन्टॉप हिल, वडाळा (पुर्व), मुंबई ३७ येथील कंपनीत या कार्यालयांच्या अधिपत्याखालील पथकाने तपासणीचेवेळी नमूद कंपनीत महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये परवाना नसल्या कारणाने खाद्यतेलाचा मोठ्या प्रमाणावर साठवणूक केलेला सुटा व पॅकबंद असलेल्या पॅकींग मधील संपुर्ण साठा हा विनापरवाना आढळुन आल्याने संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांना पुढील आदेशापर्यंत जतन करण्याच्या सुचना देवुन जागीच जप्त करण्यात आला आहे. सदर तपासणीचे वेळी नमूद कंपनीत सनफ्लॉवर तेलाचा ८३३.१२ क्विंटल साठा, ज्येष्ठा पामतेलाचा १७.९२ क्विंटल साठा, शेंगदाणा तेलाचा ३११.३९ क्विंटल साठा व वनस्पती तुपचा ८५६.१९ क्विंटल साठा हा विनापरवाना साठवणूक केल्याचे आढळुन आले आहे. प्रचलित पद्धतीनुसार जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ६-अ अंतर्गत केल्या जाणाऱ्या विल्हेवाटीच्या कार्यवाही करीता मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. या कंपनीस जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ६-ब अंतर्गत कारणे दाखवा नोटीस बजावुन या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली. सदर सुनावणीस मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. या कंपनीचे उपस्थित अधिकाऱ्यांनी जप्त साठ्याबाबतचे कागदपत्रे सादर करुन सदरचा संपुर्ण खाद्यतेलाचा साठा हा त्यांच्या कंपनीच्या मालकीचा नसुन तो मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीच्या मालकीचा असल्याचे सांगितले. तद्नंतर मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीच्या अधिकाऱ्यांना सुनावणीस पाचारण करण्यात आले. मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या खरेदी बिलांचे अवलोकन करता, त्यावर खरेदीदार म्हणुन मे. गोदरेज हर्षी लि., फिरोजशहानगर, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, विक्रोळी, मुंबई ७९ असे नमूद आहे. मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. या कंपनीचे वडाळा येथील घटनास्थळीस्थित प्रोसेसिंग युनिटमध्ये जप्त असलेल्या संपूर्ण साठ्याचे मालकीचा दावा मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीने केला असुन सदरचा जप्त साठा त्यांना परत करण्याची विनंती केली आहे. मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. व मे. गोदरेज हर्षी लि. या दोन्ही कंपन्यांचा दिनांक १५ जुन, २००७ रोजी प्रोसेसिंग ॲग्रीमेंट झाला असुन त्याअनुषंगाने मे. गोदरेज हर्षी लिं., विक्रोळी ही कंपनी खाद्यतेलाचा साठा खरेदी करुन मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि., वडाळा या कंपनीत प्रोसेसिंग व पॅकींगसाठी पाठवित आहे. सुनावणीचेवेळी मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी खरेदी बिलांवरील त्यांच्या विक्रोळी येथील कंपनीचा पत्ता नमूद असल्याबाबत निदर्शनास आणुन दिले असता त्यांनी प्रथमत: खाद्यतेलाचा साठा विक्रोळी येथील त्यांच्या कंपनीत येत असुन तद्नंतर ते मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. वडाळा येथे प्रोसेसिंग व पॅकींगसाठी पाठवित असल्याचे सांगितले आहे. सदर बाबत मे. लिबर्टी ऑईल मिल्स् लि. व मे. रुची सोया इंडस्ट्रिज लि. या कंपनीच्या सुनावणीस उपस्थित अधिकाऱ्यांनी दुजोरा देऊन त्यांनी सदर खाद्यतेलाचा पुरवठा मे. गोदरेज हर्षी लि. यांना विक्रोळी येथे केल्याचे सांगितले आहे. यावरुन सदर प्रकरणी मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. वडाळा येथील जप्त करण्यात

आलेला संपुर्ण खाद्यतेलाचा साठा हा मे. गोदरेज हर्षी लि. विक्रोळी या कंपनीच्या मालकीचा असल्याचे सिद्ध होत आहे.

मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सुनावणीस उपस्थित राहुन साठ्यासंबंधीचे पुरावादर्शक कागदपत्रे म्हणुन आयात केलेल्या खाद्यतेलाच्या साठ्याचे मे. लिबर्टी ऑईल मिल्स् लि. व मे. रुची सोया इंडस्ट्रिज लि. इ. कंपनीकडुन खरेदी केलेल्या साठ्याचे खरेदी इनव्हाईस व बिल ऑफ एन्ट्रीच्या छायांकित प्रती सादर केल्या. तसेच स्थानिक बाजारपेठेतुन खरेदी केलेल्या खाद्यतेलाच्या साठ्याचे खरेदी बिले सादर केली. मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता जप्त खाद्यतेलाच्या साठ्यापैकी सनफ्लॉवर तेल व ज्येष्ठा पामतेलाचा साठा आयात केल्याबाबतचे बिल ऑफ एन्ट्री सादर केल्या आहेत. उर्वरीत साठ्यापैकी शेंगदाणा तेल व वनस्पती तुपाचा साठा हा स्थानिक बाजारपेठेतुन खरेदी केल्याचे दिसून येते. केंद्र शासनाच्या अधिसुचनांन्वये तसेच विविध शासन परिपत्रकान्वये मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीने आयातदाराकडून खरेदी केलेल्या आयात खाद्यतेलाच्या साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. परंतू मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीचा या प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या विविध खाद्यतेलाच्या साठ्यापैकी सनफ्लॉवर व ज्येष्ठा पामतेल या आयात खाद्यतेलाच्या खरेदी साठ्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर केले नसल्याचे आढळून आले आहे. तथापि, मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीने उपरोक्त आयात साठ्याबाबत सादर केलेल्या कायदेशीर कागदपत्रांवरुन त्यांचा सनफ्लॉवर व ज्येष्ठा पामतेलाचा आयातदाराकडून खरेदी केलेला साठा वैध असल्याचे दिसून येते. शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये आयातदारास त्यांनी आयात केलेल्या साठ्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर करुन अवगत करणे क्रमप्राप्त आहे. तथापि मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी आयात केलेला साठा खरेदी केल्याबाबतचे मासिक विवरण पत्र अथवा सुचनापत्र या कार्यालयास अथवा उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांचे कार्यालयास सादर केले नसल्याचे दिसुन येते. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेता मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीने सादर केलेल्या पुरावादर्शक कागदपत्रावरुन जप्त करण्यात आलेला त्यांचा सनफ्लॉवर व ज्येष्ठा पामतेलाचा साठा हा वैध असल्याने शासन परिपत्रकानुसार आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती वेळोवेळी न चुकता या कार्यालयास सादर करण्याच्या अटीवर मे. गोदरेज हर्षी लि. यांचा जप्त करण्यात आलेला सनफ्लॉवर तेलाचा ८३३.१२ क्विंटल व ज्येष्ठा पामतेलाचा १७.९२ क्विंटल या खाद्यतेलाचा साठा, त्यांना बंधपत्र घेऊन परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत. त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी

घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. म्हणजेच डाळी/कडधान्य तसेच अन्नधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तुंचा व्यापार करणारे घाऊक व्यापारी व निर्यातदार यांना सदर अनुसुचित वस्तुंच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ अन्वये घाऊक परवाना घेण्याची आवश्यकता असुन सदर अनुसुचित वस्तुंचे व्यापार करणारे किरकोळ व्यापाऱ्यांना दि महाराष्ट्र अनुसुचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९७९ अन्वये किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ अन्वये देण्यात येणाऱ्या घाऊक परवानामधील "अट क्रमांक २(अ) नुसार अनुज्ञप्तीधारक उपरोक्त व्यवसाय परवानामधील नमुद जागेत व्यवसाय करण्याबाबत" सुचित केले असुन, अट क्रमांक २(ब) नुसार "अनुज्ञप्तीधारक ज्याला उपरोक्त धंदा चालवावयाचा आहे. अनुसुचित वस्तुचा परवानामध्ये उल्लेखिलेल्या गोदामांव्यतिरीक्त इतर कोणत्याही ठिकाणी साठवणुक न करण्याबाबत" नमुद आहे. तसेच "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविले पाहीजे व अनुज्ञप्ती, बदल करण्यासाठी, अनुज्ञप्ती प्राधिकरणाला सादर केली पाहिजे" असे स्पष्ट नमुद केले आहे.

मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीच्या वतीने सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांच्या कंपनीच्या मालकीच्या विविध खाद्यतेलाचा साठा हा मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि., वडाळा या कंपनीत साठवणुक केले असल्याचे सांगितले. मे. गोदरेज हर्षी लि. विक्रोळी यांनी निवेदनासोबत सादर केलेल्या पुरावादर्शक कागदपत्रांच्या छायांकित प्रतींचे अवलोकन करता, त्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ अन्वये खाद्यतेल व वनस्पतीच्या व्यवसायाकरीता विक्रोळी येथील कंपनीच्या पत्त्यावर घाऊक परवाना मिळण्यासाठी त्यांनी दिनांक १६/०१/२०१३ रोजी म्हणजेच तपासणीच्या नंतर अनुज्ञप्ती प्राधिकारी तथा उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांचेकडे रुपये २,०००/- अनुज्ञप्ती शुल्क तसेच रुपये ५,०००/- अनामत रकमेची भरणा केल्याचे दिसुन येते. त्याअनुषंगाने उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांनी सादर केलेल्या अहवालासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन करता, मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीस फिरोजशहा नगर, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, विक्रोळी (पुर्व), मुंबई ७९ या पत्त्यावर खाद्यतेल/वनस्पतीच्या व्यवसायाकरीता घाऊक परवाना क्र. ४५/ई/घा-०५ (५९२४) दिनांक १७/०१/२०१३ रोजी निर्गमित केल्याचे दिसून येते. सदर घाऊक परवान्यावर "वेगळे गोदाम नाही." असे नमूद आहे. यावरुन मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीने तपासणी नंतरच्या कालावधीत म्हणजेच दिनांक १७/०१/२०१३ रोजी घाऊक परवाना विक्रोळी येथील कंपनीच्या पत्त्यावर प्राप्त केला असुन त्यावर वेगळे गोदाम

नसल्याचे नमूद आहे. तथापी, मे. गोदरेज हर्षी लि. यांचा स्थानीक बाजारपेठेतुन खरेदी केलेला शेंगदाणा तेल व वनस्पती तुपाचा साठा हा त्यांच्या विक्रोळी येथील कंपनीच्या पत्त्यावर जप्त केला नसुन तो मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. वडाळा येथील कंपनीत जप्त केला आहे. संदर अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविणे बंधनकारक आहे." त्या अनुषंगाने मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीने त्यांच्याकडील घाऊक परवान्यावर मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि., वडाळा हे अतिरीक्त गोदाम म्हणुन नोंद नसल्याचे वा नविन परवान्यासाठी सादर केलेल्या अर्जावर कायमस्वरुपी अतिरीक्त गोदाम नोंदीकरीता उल्लेख केला नसल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. उपरोक्त विवेचन व अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता, मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीने माहे जुन, २००७ पासुन मे. गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेड, वडाळा, मुंबई येथे विनापरवाना खाद्यतेलाची साठवणूक केल्याचे निष्पन्न होत आहे. मे. गोदरेज हर्षी लिमिटेड, विक्रोळी, मुंबई या कंपनीने त्यांच्या मालकीचा शेंगदाणा तेलाचा ३११.३९ क्विंटल व वनस्पती तुपाचा ८५६.१९ क्विंटल साठा हा नविन परवाना मिळण्याकरीता केलेल्या विहीत नमुन्यातील अर्जावरील पत्त्यावर अथवा तपासणीनंतर प्राप्त झालेल्या घाऊक परवान्यावरील पत्त्यावर साठवणूक न करता त्यांनी मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि., वडाळा, मुंबई या अलाहिदा पत्त्यावर साठवणूक केल्याने त्यांनी महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ च्या तरतूदींचा तसेच संदर आदेशान्वये त्यांना देण्यात आलेल्या परवान्यामधील अटी व शर्तीचा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या तरतूदींचा भंग केले असल्याचे सिद्ध होत आहे. सबब, मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीचा जप्त करण्यात आलेला शेंगदाणा तेल व वनस्पती तुपाचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) प्रस्तूत प्रकरणी, मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीचा जप्त करण्यात आलेला सनफ्लॉवर तेलाचा ८३३.१२ क्विंटल साठा व ज्येष्ठा पामतेलाचा १७.९२ क्विंटल साठा हा बंधपत्र घेऊन परत करण्यात यावा.

२) प्रस्तूत प्रकरणी, मे. गोदरेज हर्षी लि. या कंपनीचा जप्त करण्यात आलेला शेंगदाणा तेलाचा ३११.३९ क्विंटल व वनस्पती तुपाचा ८५६.१९ क्विंटल साठा हा शासनजमा करण्यात यावा.

३) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण खाद्यतेल/वनस्पतीचा साठा उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांनी वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावून येणारी रक्कम, उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. गोदरेज हर्षी लि., फिरोशहा नगर, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, विक्रोळी, मुंबई
२) मे. गोदरेज इंडस्ट्रिज लिमिटेड, एल. एम. नाडकर्णी मार्ग, ॲन्टाप हिल, वडाळा पूर्व, मुंबई - ३७
(उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांचे मार्फत)

प्रत,

१) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा तथा अनुज्ञप्ती प्राधिकारी यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी. तसेच त्यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, का.क्र. ५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
४) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.